


EXISTING PLAN (SCLAE 1:200)
(BEFORE AMALGAMATION)




PROPOSED AMALGAMATION OF PLOT NO. 22,23,24 & 25
(PLAN AFTER AMALGAMATION OF PLOTS)

SUBJECT TO APPROVAL -

Recommended for approval for amalgamation proposes as amended in red colour subject to the conditions mentioned in this office letter No

Assistant Director of
Town Planning, Yavatmal

**AREA STATEMENT (before amalgamation) -**

| Plot no. | Area of plot Sq.m. | Area of curve Sq.m. | Net area of plot Sq.m. |
|---|---|---|---|
| 22 | 220.00 | ----- | 220.00 |
| 23 | 228.00 | ----- | 228.00 |
| 24 | 189.00 | ----- | 189.00 |
| 25 | 204.00 | 4.35 | 199.65 |

**AREA STATEMENT (after amalgamation) -**

| Plot no. | Area of plot Sq.m. | Area of curve Sq.m. | Net area of plot Sq.m. |
|---|---|---|---|
| 22,23, 24 & 25 | 84 .00 | 4.35 | 836.56 |

OWNER:

Mr. Ghansham N. Bagadi

ENGINEER:

AR. ABHISHEK G. BAGADI
CA/2009/46130

Abhishek G. Bagadi
B.arch.
Add - Waghapur road, Bangar nagar,
Behind Hanuman Temple, Yavatmal
Contact - 07776837111
Email - abhishek_bagadi@yahoo.co.in

PROJECT- Proposed amalgamation and subdivision of plot no. 20 & 21, in sr. no. 20/1/2, mouza Pimpalgaon, Tq. & dist. Yavatmal

SHEET TITLE-

SANCTIONING DRAWING

उप-विभागीय अधिकारी
यवतमाळ

श्री.विकास माने,उपविभागीय अधिकारी,यवतमाळ यांचे कार्यालय,यवतमाळ

भुखंड एकत्रीकरण

रा.मा.क्र.६०/एन.ए.पी.-३४/२०१४-१५

मौजा-पिंपळगांव ता.जि.यवतमाळ

आवेदक:- १.घनश्याम नंदलाल बागडी
रा.यवतमाळ ता.जि.यवतमाळ

## आ दे श

(पारीत दिनांक २३ /०६/२०१५)

मौजा-पिंपळगांव ता.जि.यवतमाळ येथील शेत सर्व्हे नं./गट क्रं.२०/१/२ चे मा.अपर जिल्हाधिकारी,यवतमाळ यांचे **फाईल वरील रा.मा.क्र.२९ /एन.ए.पी.-३४/१९९९-२००० मौजा पिंपळगांव ता.यवतमाळ मधील आदेश दिनांक ३१.०७.२०१४** अन्वये मंजुर लेआऊट मधील आवेदक **घनश्याम नंदलाल बागडी रा.यवतमाळ ता.जि.यवतमाळ** यांचे मालकीचे **भुखंड क्रं.२२ क्षेत्र२२०.०० चौ.मि.,भुखंड क्र.२३ क्षेत्र २२८.०० चौ.मि.,भुखंड क्र.२४ क्षेत्र १८९.०० चौ.मि.व भुखंड क्रं.२५ क्षेत्र १९९.६५ चौ.मि.असे एकुण क्षेत्र ८३६.६५ चौ.मि.**चे निवासी प्रयोजनाचे कामाकरीता भुखंड एकत्रीकरण करुन परवानगी मिळणेबाबतचा अर्ज दि.१२.०३.२०१५ रोजी या कार्यालयास सादर केला.

प्रकरणातील कागदत्रांचे अवलोकन केले असता मौजा-पिंपळगांव ता.जि.यवतमाळ येथील **शेत जुना सर्व्हे नं./गट नं.**२०/१/२ चे मंजुर लेआऊट मधील क्षेत्र निवासोपयोगी कामासाठी अकृषीक परवानगी मा.अपर जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे फाईल वरील रा.मा.क्र.२९ **/एन.ए.पी.-३४/१९९९-२००० मौजा पिंपळगांव ता.जि.यवतमाळ आदेश पारीत दिनांक ३१.०७.२०१४** रोजीचे अखेरचे आदेशान्वये मंजुर करण्यांत आलेली आहे. सदर भुखंड आवेदक घनश्याम नंदलाल बागडी रा.यवतमाळ ता.जि.यवतमाळ यांचे नावाने असल्याचे ७/१२ वरुन (अधिकार अभिलेखावरुन) दिसुन येते.

सदर प्रकरणांत या कार्यालयाचे पत्र **क्रमांक.प्रस्तु.१/उविअ/कावि-**३८८/२०१५ दिनांक २६.०३.२०१५ नुसार जाहीरनामा काढण्यांत आला व त्यामध्ये वरील भुखंडांबाबत/जमीनीबाबत हितसंबंध असणा-या ज्या कोण्या व्यक्तीस आक्षेप घ्यावयाचे असतील त्यांनी दिनांक २५.०४.२०१५ चे आंत किंवा तत्पुर्वी या कार्यालयास लेखी स्वरुपात सादर करावेत असे सुचित करण्यांत आले होते. सदर प्रकरणांत कोणाचाही आक्षेप दाखल झालेला नाही.

ज्याअर्थी,प्रकरणांत सहाय्यक संचालक,नगर रचना यवतमाळ यांनी त्यांचे पत्र जा.क्र.एकत्रिकरण/मौ पिंपळगाव ता.यवतमाळ/स.न.२०/१/२/ससंनरय/५९५ दिनांक ५.५.२०१५ नुसार अभिप्राय सादर केला. त्याचे अवलोकन केले असता मौजा पिंपळगांव ता.जि.यवतमाळ येथील शेत **सर्व्हे नं./गट नं. २०/१/२ चे मंजुर अभिन्यासातील भुखंड क्रमांक** २२ ते २५ एकुण क्षेत्र **८४१.०० चौ.मि.** मध्ये एकत्रिकरण करण्याची परवानगी खालील अटींवर मंजुरीची शिफारस करण्यांत येत असल्याचे कळविले आहे.

१.एकत्रित भुखंडावर कोणताही विकास करतांना स्थानिक प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेण्यांत यावी.

२.एकत्रित भुखंडावरील विकास करतांना अ **ब व क** वर्ग नगर.परिषदे लागू असलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीचे पालन करण्यात यावे.

३.एकत्रित भुखंडावरील विकास कामामुळै आजुबाजुंच्या परिसरातील रहिवाश्यांचे सेवा व सुविधा अधिकार बाधीत होणार नाही याची दक्षता घेण्यांत यावी.

४.विभाजीत भुखंड एकत्रीकरणाबाबतची नोंद महसूल दप्तरी घेणे आवश्यक आहे.

१.

ज्याअर्थी सरपंच/सचिव,ग्रा.पं.पिंपळगांव ता.जि.यवतमाळ यांनी त्यांचे पत्र दिनांक ६.४.२०१५ नुसार भुखंड क्र.२२ ते २५ यांचे एकत्रिकरणास नाहरकत आसल्याचे कळविले आहे..

ज्याअर्थी, तहसिलदार यवतमाळ यांना या कार्यायाचे पत्र क्रमांक/प्रस्तु.१/कावि/४८६/ २०१५ दिनांक २७.०४.२०१५ नुसार उक्त प्रकरणात अभिप्राय मागविण्यांत आला असुन नियमानुसार नाहरकत असल्याचे कळविले आहे.

महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम-४४ व महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाचे परिपत्रक क्रमांक-एनएपी-१०८८/प्र.क्र.१२७५/ल-२,दिनांक १२.१०.१९८८ व मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे पत्र क्र./अका/राजस्व-१/ल-२,दिनांक २९.११.२०१० नुसार मला प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारान्वये मी,विकास माने,उपविभागीय अधिकारी,यवतमाळ आवेदक घनश्याम नंदलाल बागडी रा. यवतमाळ ता.जि.यवतमाळ यांचे मालकीचे भुखंड क्रमांक २२ ते २५ चे एकुण क्षेत्र ८४१.०० चौ.मि. चे निवासी प्रयोजनाचे कामाकरीता एकत्रीकरण करण्याची परवानगी खालील अटी व शर्तीवर मंजूर करण्यांत येते.

सहाय्यक संचालक,नगर रचना यवतमाळ व सरपंच ग्रामपंचायत पिंपळगांव यांनी घालून दिलेल्या सर्व अटींचे पालन करणे आवेदकांवर बंधनकारक राहील.
इतर अटी व शर्ती मा.अपर जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे रा.मा. क्र.२९/एन.ए.पी.-३४/१९९९-२००० मौजा पिंपळगांव ता. जि.यवतमाळ यामधील दिनांक ३१.०७.२०१४ चे आदेशाप्रमाणे कायम राहतील.

**एकत्रीकरण परिशिष्ट खालील प्रमाणे.**

मौजा-पिंपळगांव ता.जि.यवतमाळ येथील शेत सर्व्हे नं/ग.न. २०/१/२ चे मंजूर लेआऊट मधील भुखंड क्रमांक २२,२३,२४,२५ एकुण क्षेत्र ८४१.०० चौ.मि. चे.एकत्रीकरण खालील प्रमाणे क्षेत्रफळ राहील.

| भुखंड क्रमांक | भुखंडाचे क्षेत्रफळ चौ. मि. | नविन भुखंड क्रमांक | एकत्रीकरण नंतर क्षेत्रफळ चौ.मि. | वार्षिक अकृषक आकार प्रति चौ.मि. रुपये ०.१० प्रमाणे. |
|---|---|---|---|---|
| २२ | २२०.०० | २२+२३+२४+२५ | ८३६.६५ | ८४/- |
| २३ | २२८.०० | | | |
| २४ | १८९.०० | | | |
| २५ | १९९.६५ | | | |

१.एकत्रीकरण नंतर भुखंडाचे निवासी प्रयोजनाचे वापराकरीता एकुण क्षेत्रफळ ८३६.६५ चौ.मि.
२.वार्षिक अकृषिक आकार निवासी प्रयोजनासाठी रुपये ८४/- (रुपये चौ-यांशी फक्त.)
३.या आदेशानंतर उपरोक्त क्षेत्रावर आवेदकांची मालकी राहील.

उपविभागीय अधिकारी
यवतमाळ

क्रमांक/उविअ/प्रस्तु.१/कावि/ ६२५/२०१५
उपविभागीय अधिकारी यवतमाळ यांचे कार्यालय
यवतमाळ दिनांक २३/०५/२०१५

प्रतिलिपी:-
**माहिती तथा कार्यवाहीस अग्रेषित.**
१.श्री.घंनश्याम नंदलाल बागडी रा.यवतमाळ ता.जि.यवतमाळ
२.तहसिलदार,यवतमाळ
३.उपअधिक्षक,भुमी अभिलेख यवतमाळ
४.दुय्यम निबंधक,यवतमाळ
५.तलाठी,पिंपळगांव ता.जि.यवतमाळ
६.सरपंच/सचिव,ग्रामपंचायत,पिंपळगांव ता.जि.यवतमाळ

२३/६/१५
उपविभागीय अधिकारी
यवतमाळ

उपविभागीय अधिकारी यवतमाळ